# कपांची रचना: एक मूल्यमापन




अशी कल्पना करा की तुम्ही एखाद्या कॉफी शॉपचे मालक/मालकीण आहात.

वर काही कपांचे नमुने चित्र स्वरूपात दाखविली आहेत. यापैकी एक कप आपल्या कॉफी शॉपसाठी निवडायचा असल्यास, आपण कोणता कप निवडाल?

कप निवडतांना कोणत्या पाच निकषांचा विचार कराल?

वरील चित्रात दाखविलेले कपांचे डिझाइन्स फक्त नमुन्याखातर आहेत.
आपण या व्यतिरिक्त आणखी कपांचे नमुने विद्यार्थ्यांना देऊ शकता.

प्रतिमा स्त्रोत: पिक्साबे (पब्लिक डोमेन / क्रिएटिव कॉमन्स CC0)

# कपांची रचना: एक मूल्यमापन

डिझाइन आणि तंत्रज्ञान शिक्षणाच्या क्षेत्रात बऱ्याचदा वस्तूंचे मूल्यमापन करणे हे एक उपयुक्त कार्य मानले जाते. उदाहरणार्थ, मार्टिन (2007) असे सुचवतो की वस्तूंचे मूल्यमापन केल्यामुळे विद्यार्थ्यांना विविध वस्तु कश्या प्रकारे समान गरजा पूर्ण करतात हे समजून घेण्यास मदत होते. तसेच त्यांना स्वतःचे काम त्यांच्या सभोवतालच्या जगाशी कसे संबंधित आहे हे जाणून घेण्याची संधी मिळते. या कार्यात निरीक्षण आणि संप्रेषण कौशल्यांच्या विकासाला वाव आहे.

वस्तूंच्या मूल्यांकनावर आधारित कार्ये नवीन डिझाइनर्सना एखाद्या वस्तु मधील वैशिष्ट्ये ओळखून ती पुन्हा डिझाइन करण्यासाठी प्रेरित करतात (Crismond, 2001). तांत्रिक क्षमता विकसित करण्याव्यतिरिक्त (Martin, 2007), वस्तूंचे मूल्यांकन करणे हे मुलांचा आत्मविश्वास वाढविणे, विद्यार्थ्यांचे तंत्रज्ञानाशी संबंधित रूढीवादी विचार प्रकट करणे, मूलभूत सामाजिक–सांस्कृतिक घटकांचा डिझाइनवर कसा परिणाम होतो हे ओळखणे इत्यादींसाठी उपयोगी आहे (Garvey & Quinlan, 2000; Siraj-Blatchford, 1995; McLaren, 1997; Moalosi et al., 2007). सर्वसाधारणपणे, एका सोप्या उत्पादन मूल्यमापन कार्यामध्ये विविध उपकार्ये समाविष्ट असू शकतात. जसे की, तपासणी करणे, सामर्थ्य / कमकुवतपणा ओळखणे, प्राधान्य निश्चित करणे, विरोधाभास ओळखणे, कल्पना मांडणे व त्यांचे परीक्षण करणे इत्यादी.

*Adapted from:* Ara, F. (2013). *Investigating students', teachers' and designers' ideas about design and developing design activities for Indian middle school students* (Doctoral Thesis). Mumbai: HBCSE, TIFR Deemed University.

## References

Crismond, D. (2001). Learning and using science ideas when doing investigate-and-redesign tasks: A study of naïve, novice and expert designers doing constrained and scaffolded work. *JRST 38*(7), 791-820.

Garvey, J., & Quinlan, A. (2000). Evaluation and design and technology. In J. Sefton- Green and R. Sinker, *Creativity: Making and learning by young people*. Routledge, Taylor and Francis Group.

Martin, M. (2007). Role of product evaluation in developing technological literacy. In J. R. Dakers, W. Dow and M. J. de Vries (eds), *PATT 18, International Conference on D&T Education Research*. Glasgow.

McLaren. S. (1997). Value judgements: Evaluating designs: A Scottish perspective on a global issue. *IJTDE, 7,* 259-276.

Moalosi, R., Popovic, V., & Hickling-Hudson, A. (2007). Product analysis based on Botswana's postcolonial sociocultural perspective. *International Journal of Design, 1*(2), 35-43.

Ritchie, R. (2001). *Primary design and technology: A process for learning.* London: David Fulton Publ. Ltd.

Siraj-Blatchford, J. (1995). Kelly's repertory grid: A technique for developing evaluation in design and technology. In J. S. Smith (Ed.), *IDATER 95.* Loughborough University of Technology.